# कला, विद्वत्ता असल्यास दाद मिळतेच

## आंतरराष्ट्रीय ख्यातीचे रचनाकार सुधीर जांभेकर यांचे मत

पुणे, ता. १५ : जगात सगळीकडे चांगली लोक आहेत. तुमच्याकडे कला, विद्वत्ता असेल, तर त्याला दाद मिळतेच. त्या वेळी तुम्ही कोणत्या देशाचे आहात, हा विचार होत नाही, असे मत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे रचनाकार सुधीर जांभेकर यांनी व्यक्त केले.

कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने आयोजित कार्यक्रमात जांभेकर यांच्या दहा ई पुस्तकांचे प्रकाशन झाले. त्या वेळी ते बोलत होते. प्रसिद्ध वास्तुरचनाकार सेन कपाडिया, संस्थेच्या माजी अध्यक्षा स्नेहलता सहस्त्रबुद्धे, सचिव पीव्ही श्रीनिवास शास्त्री, बुकगंगाचे मंदार जोगळेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य अनुराग कश्यप आदी उपस्थित होते. जांभेकर हे मराठी वृत्तपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांचे चौथ्या पिढीतील हे वंशज आहेत.



**आयुका : दहा ई-पुस्तकांच्या प्रकाशनानंतर कार्यक्रमात (डावीकडून) सेन कपाडिया, सुधीर गाडगीळ, मंदार जोगळेकर व सुधीर जांभेकर.**

कार्यक्रमातील मुलाखती दरम्यान जांभेकर यांनी, अहमदाबादमधील ते अमेरिकेतील स्थिरावलेले प्रसिद्ध उद्योजक याचा प्रवास उलगडला. मुंबईत नोकरी करीत असताना मला अमेरिकेत जाऊन वास्तुरचनांचा अनुभव घेण्याच्या अनेक संधी मिळाल्या, असे त्यांनी सांगितले.

भारत, सौदी अरेबिया, चीन, अमेरिका या देशांतील विविध शहरांतील वास्तुरचना कशा केल्या, उंच इमारती, पूल यांबरोबरच मशिदीची रचना कशी केली, वेगवेगळ्या इमारतींच्या डिझाईन, त्या तयार करताना मिळालेले स्वातंत्र्य याबद्दल आठवणी जांभेकर यांनी सांगितल्या.

न्यूयॉर्कमध्ये व्यवसाय, या मोठ्या शहरात तीनमजली कार्यालय हे कसे शक्य झाले, या प्रश्नावर ते म्हणाले, 'अमेरिकेत बुद्धीचे चीज होते. तुमच्याकडे टॅलेंट असेल, तर तुम्ही कोणत्या देशाचे याचा विचार अमेरिकेत होत नाही. हा त्या लोकांचा स्वभाव आहे. जगात सगळीकडे चांगले लोक आहेत. तुमच्याकडे फक्त कौशल्य हवे. सेन कपाडिया आणि सुधीर गाडगीळ यांनी त्यांची मुलाखत घेतली.

जोगळेकर यांनी, सॉफ्टवेअर ते प्रकाशक ही वाटचाल विशद केली.

**भारतीय शास्त्रीय संगीत आणि वास्तुरचना याचे अतूट नाते आहे. वास्तुरचना ही गोठवलेले संगीतच आहे. प्रत्येक वास्तुरचनाकाराने कोणतीही रचना करताना आर्थिक लाभाचा विचार करण्याबरोबरच रचनेचा समाज आणि पुढील पिढ्यांना होणाऱ्या फायदाचाही विचार केला पाहिजे.**

**सुधीर जांभेकर,** आंतरराष्ट्रीय ख्यातीचे वास्तुरचनाकार

मराठीतील सर्व दर्जेदार साहित्य ई बुक स्वरूपात आणण्याची गरज व्यक्त केली. मराठी माणसाची वाचनाची आवड कमी झालेली नाही, तर बदललेली परिस्थिती आणि तंत्रज्ञानानुसार नव्या पिढीला त्यांना हव्या असलेल्या माध्यमातून पुस्तके उपलब्ध करून दिली पाहिजेत, असे मत त्यांनी व्यक्त केले.